क्रमांक : पुविमं/शाखा आय-१/मान्यता
पुणे - ४११०१०

दिनांक: १८/११/८८

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

दी आंध्र स्कूल,
१२६४/४, रँग्लर परांजपे रोड, डेक्कन जिमखाना,
पुणे - ४११००४

विषय :- माध्यमिक शाळांना तात्पुरती प्रथम मान्यता व सांकेतिक क्रमांक देण्याबाबत ....

(५)

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली २८(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सन १९८७-८८ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस(मार्च/ऑक्टोबर) विद्यार्थी पाठविण्यासाठी आपल्या शाळेस शिक्षण उपसंचालक यांनी घातलेल्या अटींच्या पूर्ततेवर तात्पुरती प्रथम मान्यता व ११-२६८ हा तात्पुरता सांकेतिक क्रमांक इंग्रजी या माध्यमाकरिता देण्यात येत आहे.

शाळेने नोंदणी शुल्काची रक्कम आपल्या गावातील अगर गावानजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या शाखेत मंडळाच्या खाते क्रमांक X मध्ये भरावी व भरणा केल्याचे पुणे विभागीय कार्यालयास चलनाच्या प्रतीसह कळवावे.

पुणे विभागीय मंडळाची नाशिक/कोल्हापूर ही दोन उपकार्यालये असून आपली शाळा ------------ या उपकार्यालयाच्या कक्षेत येत असल्याने आपण खाली नमूद केलेल्या पत्त्यावर परीक्षेसंबंधीच्या सर्व पत्रव्यवहारासाठी समक्ष संपर्क साधावा.

कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना शाळेचा निर्धारित सांकेतिक क्रमांक असणे आवश्यक आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

विभागीय सचिवांकरिता,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११०१०.

उपकार्यालयाचे पत्ते :-

१. सहसचिव (कनिष्ठ)
म. रा. मा. शि. व उ. मा. शि. मंडळ,
पुणे विभागीय मंडळाचे
नासिक उपकार्यालय,
रुंग्ठा हायस्कूल इमारत,
नासिक.

२) सहसचिव (कनिष्ठ)
म. रा. मा. व उ. मा. शि. मंडळ,
पुणे विभागीय मंडळाचे
कोल्हापूर उपकार्यालय,
विक्रम हायस्कूल, १३५, शिवाजी पार्क,
कोल्हापूर.

जोगदेव.